G.M.D. ARTS, B.W. COMMERCE & SCIENCE COLLEGE SINNAR 422 103

**म. वि. प्र. समाजाचे**

मराठा विद्या प्रसारक समाज

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर,

**" अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या शिफारसी नुसार "**

वर्ष २०२१ - २२ दि.१९/०२/२०२२

# कार्यक्रम अहवाल

| | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रम | : | शिवजयंती व प्रतिमापूजन |
| संकल्पना / विषय | : | " शिवजी महाराज प्रतिमापूजन व व्याख्यान " |
| कार्यक्रमाचा स्थर | : | महाविद्यालय |
| आयोजक / विभाग / समिती | : | इतिहास विभाग |
| दिनांक | : | दि.१९/०२/२०२२ वेळ : स.९.३० |
| एकुण विद्यार्थी संख्या सहभाग | : | ९० मुले : ३५ मुली : ५५ |
| प्रमुख अतिथी | : | मा.डॉ. आबा पाटील |

दि.१९/०२/२०२२ रोजी गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर येथे शैक्षणिक वर्ष २०२१ – २२ या वर्षात शिवजयंती प्रतिमापूजन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी व व्याख्याते म्हणून डॉ. आबा पाटील हे उपस्थित होते. त्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले.डॉ.आबा पाटील आपल्या व्याख्यानात म्हणाले की , शिवाजी महाराजांची जयंती फक्त १९ फेब्रुवारी पुरताच साजरी करू नये. महाराजांचे विचार आपण आचरणात आणू त्यावेळी शिवजयंती साजरी होईल. पुढे त्यांनी व्याख्यानात महाराजांच्या जीवनातील अनेक घटनांचे बारकावे सांगितले. महाराजांचे विचार काळाच्या पुढचे होते. आजही आपण महाराजांचे विचार घेऊन जागलो तर नक्कीच महाराजांच्या स्वप्नातले सुराज्य निर्माण होईल. असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयात महाराजांची प्रतिमा रांगोळीत काढणाऱ्या विद्यार्थिनी व प्रा. एस.आर. मोरे यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.पी .व्ही .रसाळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.चंद्रशेखर बर्वे यांनी करून दिला. आभार प्रदर्शन प्रा.आर. व्ही. पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. एस.आर. मोरे
इतिहास विभागप्रमुख
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला
भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक

डॉ. पी.व्ही रसाळ
प्राचार्य
जी.एम.डी.आर्टस्, बी.डब्ल्यु. कॉमर्स अँण्ड
सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नाशिक